# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - ९ मे २०२५

---

जळगाव दि.९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामध्ये व्यवस्थापन प्रशाळेमध्ये १२ वी नंतर चार वर्षाचा पदवी कोर्ससाठी प्रवेश प्रक्रीया सुरु झाली आहे.

विद्यापीठ परिक्षेत्रातील व्यवस्थापन प्रशाळेमध्ये १२ वी पास (आर्ट,कॉमर्स,सायन्स) व इतर पदवीका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी ॲप्रेंटिसशिप ॲम्बडेड चार वर्षीय बी.कॉम (बीएफएसआय) या पदवी कोर्ससाठी प्रवेशाला सुरुवात झाली आहे. बी.कॉम (बीएसएफआय) हा कोर्स महाराष्ट्र शासन व व सीआरआयएसपी यांच्या सामंजस्य करारानुसार व बीएसएफआय सेक्टर स्कील कौन्सील यांच्या विद्यमाने पेड ॲप्रेटींसशिपची संधी उपलब्ध होणार आहे. या कोर्समुळे विद्यार्थ्यांना बँकींग, फायनान्स, विमा तसेच मायनॉर (उपविषय) इकॉनोमिक/डेटा सायन्स यामध्ये रोजगाराची संधी मिळू शकते. बी.कॉम (बीएसएफआय) या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम, दोन वर्षांचा पदवीका कोर्स तसेच तीन वर्षांचा पदवी कोर्ससाठी प्रवेश उपलब्ध आहे. या कोर्समध्ये मोठ्या प्रमाणात लवचिकता असल्याने विद्यार्थ्यांना श्रेयांक संरचनेसह अभ्यासक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य असेल. त्याच्या कालावधीनुसार प्रमाणपत्र, पदवीका, पदवी त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. पहिल्या सहा महिन्यात-अकाउन्ट असिस्टंट, एक वर्ष कालावधी साठी – जीएसटी असिस्टंट, दिड वर्ष कालावधी – विमा सल्लागार, दोन वर्ष कालावधी – म्युचल फंड डीस्ट्रीब्युटर इत्यादी सर्टीफीकेट देण्यात येतील. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी मोठे वरदान ठरणार आहे. या अभ्यासक्रमा अंतर्गत विविध विषय कौशल्य आधारीत निवड बहूविद्याशाखीय असतील. हा कोर्स रोजगाराभिमुख क्षमता विकसित करणे आणि पेड ॲप्रेंटीसची संधी यामध्ये विद्यार्थ्यांना उपलब्घ होणार आहे. या कोर्ससाठी लागणारे माहितीपुस्तक व फॉम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.nmu.ac.in यावर उपलब्ध आहे. ॲडमीशन ऑनलाईन व ऑफलाईन सुरु झालेली आहे. तरी या संधीचा अधिक लाभ घ्यावा असे आवाहन प्रा.मधूलिका सोनवणे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ०२५७-२२५७४६३, दिपक फेरवाणी -९०७३२७७८४८, अश्विनी मुंदडा-९०२८८२५२८४, दामीनी पाटील- ७०२०९३८८९८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन विभागप्रमुख प्रा. रमेश सरदार यांनी केले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.विनोद पाटील)
कुलसचिव